# तहसिल कार्यालय हवेली , पुणे

९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे - २

दुरध्वनी क्र. ०२०-२४४७२३४८ ई- मेल- tahsildarhavelipune@gmail.com


जा.क्र.एनए.एसआर/२८१/२०२२
दिनांक ०८/०९ /२०२२

प्रति,

**गाव कामगार तलाठी वडगाव बुद्रुक**
**ता. हवेली, जि.पुणे.**

विषय :- जमिन पुणे
मौजे वडगाव बुद्रुक, ता. हवेली, जि.पुणे येथील जमीन **स.नं ४१ब/४ क्षेत्र ३६०.५२ चौ.मी. क्षेत्रास निवासी** प्रयोजनार्थ अकृषिक झाल्याची नोंद घेणेबाबत.

संदर्भ :- १. **श्री. विश्वनाथ वसंतराव भरेकर रा. वडगाव बुद्रुक, ता. हवेली, जि.पुणे ४११०४१ यांचा दि. १८/०६/२०२२ रोजीचा अर्ज.**

२ महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील दि. ०५/०१/२०१७ रोजीची अधिसुचना व शासन परिपत्रक क्र. एनए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दि. १९ ऑगस्ट २०१७

**मौजे वडगाव बुद्रुक,** ता. हवेली, जि.पुणे येथील जमिन स.नं./ग.नं./न.भू.क्र. **४१ब/४ मधील** रेखांकनात समाविष्ट केलेले **४००.०० चौ.मी. मधील रस्त्याखालील / इतर आरक्षणाखालील क्षेत्र ३९.४८ चौ.मी. वगळून उर्वरित ३६०.५२ चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ परवानगी मिळणेबाबत** अर्जदार **श्री. विश्वनाथ वसंतराव भरेकर रा. वडगाव बुद्रुक, ता. हवेली, जि.पुणे** यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने आगाऊ बिनशेतसारा शासन जमा करणेबाबतच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे/गट/सिटी सर्व्हेनंबर | |
|---|---|---|---|---|
| | **वडगाव बुद्रुक** | **हवेली** | ४१ब/४ | |
| | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे न /गट नं/न.भू.क्र. | ७/१२ नुसार अर्जदार यांचे एकूण क्षेत्र ( चौ.मी) | बिनशेती करावयाचेक्षेत्र ( चौ.मी.) |
| १ | **विश्वनाथ वसंतराव भरेकर** | ४१ब/४ | ४००.०० | ४००.०० |

| | | |
|---|---|---|
| २ | अर्जदार यांनी रेखांकन नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र | ४००.०० चौ.मी. |
| ३ | यापूर्वी अकृषिक परवानगी घेतलेले क्षेत्र | - |
| ४ | इतर आरक्षणाखालील /रस्त्याखालील क्षेत्र | ३९.४८ चौ.मी. |
| ५ | आरक्षणाखालील क्षेत्र | - |
| ६ | अकृषिक परवानगीचे क्षेत्र | ३६०.५२ चौ.मी. |
| ७ | निवासी प्रयोजनार्थ | ३६०.५२ चौ.मी. |
| ८ | वाणिज्य प्रयोजनार्थ | - |
| ९ | रेखांकनाचे प्रयोजन | निवासी |

अर्जदार यांना या कार्यालयकडील पत्र क्र. LND/NA/PMC/NOC/SR/२८१/२०२२ दि. २६/०८/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे बिनशेतसारा शासनजमा करणेबाबत कळविणेत आलेले होते.

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणी | निवासी |
| | | ३६०.५२ |
| २ | बिनशेती आकारणीचा दर ( प्रति चौ.मी.) | १.०८/- |
| ३ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | ३८९/- |
| ४ | रुपांतरीत कराची आकारणी | १९४५/- |
| ५ | अनाधिकृत अकृषिक वापराबाबत ४० पट दंड | - |
| ६ | एकुण रक्कम रुपये | २३३४/- |

वरीलप्रमाणे अर्जदार यांनी देय रक्कम **३६०.५२ चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ** र.रु. १.०८/- प्रती चौ.मी. या दराने वार्षिक आकारणी र.रु. ३८९/-, रुपांतरीत कराची र.रु. १९४५/- असे एकूण रक्कम रुपये **२३३४/-** एवढी रक्कम चलन GRNMH००७३३७९८३२०२२२३M दि. ०६/०९/२०२२ रोजी शासकीय कोषागारात जमा करुन चलनाच्या प्रती या कार्यालयास सादर केलेल्या आहेत. तसेच विषयांकित मिळकतीवरील पुणे महानगरपालिका यांचेकडील कमेन्समेन्ट सर्टिफिकेट सीसी/०७६८/२०२२ दि. २३/०६/२०२२ अन्वये दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणांस याव्दारे कळविणेत येते की, विषयांकित जमिनीच्या गाव नमुना नं. २ मध्ये अकृषिक झाल्याची नोंद ( बिनशेतीकडे **निवासी क्षेत्र ३६०.५२ चौ.मी.** ) क्षेत्राची नोंद घेणेसाठी चलनाची प्रत सोबत जोडली आहे.

सही/-xxx
(तृप्ती कोलते - पाटील)
तहसिलदार हवेली ( पुणे)

प्रत :- १ **श्री. विश्वनाथ वसंतराव भरेकर रा. वडगाव बुद्रुक, ता. हवेली, जि.पुणे**
२. उप अभियंता,बांधकाम विकास विभाग, पुणे महानगरपालिका पुणे यांस माहितीसाठी.

तहसिलदार हवेली सत्यमेव जयते

( तृप्ती कोलते - पाटील)
तहसिलदार हवेली ( पुणे)